ऑक्टोपस

एवलिन शॉ

चित्र: राल्फ कार्पेन्टियर

मराठी: अश्विनी बर्वे



ऑक्टोपस


एवलिन शॉ


चित्र: राल्फ कार्पेन्टियर





ऑक्टोपस





समुद्रातील खडकाच्या भेगेतून एक डोळा बाहेर बघत आहे. तो डोळा छोट्या माशांना पोहतांना बघत आहे.

तो डोळा एका मादी ऑक्टोपसचा आहे.

ऑक्टोपसचे शरीर मोठे आणि फुगासारखे गोल असते.

त्याच्या आठ लांब भुजा असतात. त्या त्याच्या शरीराला लपेटलेल्या असतात.

ऑक्टोपस अन्नाच्या शोधात आपल्या घरातून निघण्यासाठी तयार आहे.






तेव्हाच एक दुर्घटना घडली. एक छोटी नाव, खडकाला धडकली. नाव मागे होऊन परत पुढे जाऊ लागली. त्यामुळे एक खडक समुद्राच्या तळाशी गेला. छोटे मासे पाण्यात बिनधास्त पोहतात. एक खेकडा मऊ वाळूत खोदत आहे.







ऑक्टोपसची मादी घाबरून पिवळी पडली
आहे. ती धापा टाकत आहे.

तिचे शरीर छोटे होत आहे,मग
परत मोठे होते आणि परत छोटे
होते. अचानक तिच्या घराच्या
समोर एक मोठा खडक पडतो.

ऑक्टोपसची मादी आत अडकली आहे.

ती खडकाला ढकलण्याचा प्रयत्न करते,

पण खडक खूप जड आहे.

ती आपल्या भुजांच्या साहय्याने


एक छोटेसे छिद्र शोधते.

ती आपले शरीर छोटे आणि सपाट करते.

असे करणे तिला सहज शक्य आहे.


कारण ऑक्टोपला हाडे नसतात.





जेव्हा ती बाहेर पडते
तेव्हा तिचे शरीर परत गोल होते.
ऑक्टोपसची मादी आपल्या
आठ पायांवर उभी राहते
आणि दूर निघून जाते.





त्याचवेळी अजून एक मोठा खडक पडतो.
आता तर ऑक्टोपची मादी कधीच
आपल्या घरात घुसू शकणार नाही.

ऑक्टोपसची मादी संकटात आहे. तिला नवीन घर पाहिजे आहे. तिला अशी जागा पाहिजे जिथे ती लपू शकेल, आराम करू शकेल आणि खाऊ शकेल. मग ती एक घर शोधू लागते. तिला एक छिद्र दिसते. ती एका पायाचे टोक त्या छिद्रात घालते. हे बघण्यासाठी की ते छिद्र किती खोल आहे. पण तर एका छोट्या माशाचे घर होते.




मासे पोहत बाहेर येतात आणि ऑक्टोपसला चावतात.




ऑक्टोपस ची मादी पुढे जाते,
तिला दुसरे छिद्र सापडते, ते एका
दुसऱ्या ऑक्टोपसचे आहे.




तो आपल्या घराच्या रक्षणासाठी
बाहेर येतो आणि मग ते दोघे तिथे
भांडायला लागतात.




ते एकमेकांना चारी बाजूंनी आपापल्या पायांनी धरून ठेवतात. त्यांचा हलका रंग गडद होत जातो. आणि परत हलका होतो. ते खडकांवरून घसरतात. शेवटी ऑक्टोपसची मादी बाजूला होते. आणि दूसरा ऑक्टोपस आपल्या घरात परत जातो.





तिला लागलं नाही, पण राहण्यासाठी
तिला अजून जागा मिळाली नाही.



ऑक्टोपस आपल्या आठ पायांनी चालत समुद्री शेवाळावर पोहचते. तिथे ती आराम करायला थांबते. तिचे शरीर पांढर होत आहे. तिची त्वचा खडबडीत होत आहे. यामुळे इतर प्राण्यांना ती दिसणे कठीण आहे. आता ती एकदम समुद्री शेवाळया सारखी दिसते आहे.







समुद्रात इतर झाडं सुद्धा आहेत.

पण ऑक्टोपस त्या सर्वांसारखा दिसू शकत नाही. त्याच्या त्वचेत काहीच रंग आहेत. तो नारंगी-लाल किंवा सफेद होऊ शकतो. किंवा तिचा रंग हलका किंवा गडद होऊ शकतो.

नंतर ऑक्टोपस समुद्री शैवाळयाचे अंथरून सोडून देते. ती आपल्या पायांना लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीला स्पर्श करते. ती पायांच्या साहय्याने प्रत्येक गोष्टीचा अनुभव घेते आणि स्वाद घेते.

ऑक्टोपस ला एक छोटेसे भोक सापडते. ती आपल्या मजबूत तोंडाने ते मोठे करते तिने चावल्यावर भोकात असणारा प्राणी हलू शकत नाही,





ती त्या प्राण्याला खायला सुरुवात करते पण ऑक्टोपस इथे सुरक्षित नाही.


एक ईल भोकातून आपले डोकं बाहेर काढते.

ईलला, ऑक्टोपसचा वास येतो आणि

तो तिच्याकडे पोहत जायला लागतो.

त्याला ऑक्टोपसला खायचं आहे.

अचानक ऑक्टोपसला ईल दिसतो.






ती आपलं खाणं सोडून देते आणि तिचे
शरीर काळे पडू लागते. ती आपल्या
शरीरातून काळ्या शाईचा ढग सोडते.

ईल शाईत पोहते.

म्हणून ऑक्टोपसला तो दिसत नाही..

ऑक्टोपसची मादी पळून जाते.



तो आपल्या शरीरातून पाण्याच्या धारा सोडतो.
तो समुद्रात वेगाने पुढे जातो.

जेव्हा ऑक्टोपसच्या मादीला सुरक्षित वाटते

तेव्हा तिचा वेग कमी होत जातो.

ती पॅराशूट सारखे आपल्या बाहू पसरते.

काही खडकांवरून ती घसरते.





तिथे खडकात तिला एक भोक सापडते.ती त्यात आपले तीन पाय टाकते, तेव्हा तिला कळते की ते भोक भरपूर खोल आहे.


ती त्या खड्ड्यात आत जाते. ती त्याच्या प्रत्येक भागाला स्पर्श करते.

तो खड्डा तिच्यासाठी योग्य आहे.

तिला एक नवीन घर मिळते.

ऑक्टोपस तिथे आराम करते,

आणि समुद्राकडे बघते..




एक खेकडा खडकावरून चालतो,

तो तिच्या शेजारूनच चालत आहे.

ऑक्टोपस खेकडा बघते.





खेकडयाला एक मेलेला मासा सापडतो
आणि तो त्याला खायला सुरुवात करतो.
हुई ऑक्टोपसची मादी आपल्या घरातून
बाहेर येते.




ती खेकडयावर झडप घालते. त्याचे
शरीर काळे पडत जाते. त्याचे पाय
छत्री उघडल्यासारखे पसरतात.

ती पायांवर असणाऱ्या टोकांनी
खेकड्याला घट्ट पकडते.


ती खेकड्याला चावते. तो हलू
शकत नाही, मग ऑक्टोपस,

खेकडयाला आपल्या घरात खेचते.



ती आपल्या तोंडाने खेकड्याला
फाडते आणि मग त्याचे मास खाते.

खाऊन झाल्यावर ती कातड्याचे
तुकडे बाहेर टाकून देते.



ऑक्टोपसच्या मादीने अनेक महिने आधी एका नर ऑक्टोपसबरोबर संभोग केला होता.

आता वसंत आला आहे.



ऑक्टोपस मादीची अंडे देण्याची वेळ जवळ आली आहे. ती तयारी करू लागते.

ऑक्टोपस मादी आपल्या घराच्या बाहेर तों पाय ठेवते. जिथे तिला दोन छोटे दगड सापडतात.

ती आपल्या पायांनी ते दगड पकडते.


आणि त्यांना घरात खेचते.

ती राहत असलेला खड्डा छोटा बनवते.

ज्यामुळे मोठे प्राणी आत येऊ शकणार नाही.

मग ती अंडे देते. ती शेकडो अंडी देते.


ऑक्टोपस अंड्यांना आपल्या घरात खडकावर ठेवते. आता ती अन्नाच्या शोधात बाहेर जात नाही.





ती आपल्या अंड्याचे रक्षण करते. ती छोटे मासे
आणि झिंग्यांना अंडी खाण्यापासून रोखते.

ती अंडी स्वच्छ ठेवण्यासाठी आपल्या
पाय त्यावर रगडते अनेक आठवडे ती
आपल्या घरातून बाहेर निघत नाही.






शेवटी अंडी फुटतात.


ऑक्टोपसला शेकडो मुलं होतात. मुलांच्या अंगावर पिवळे आणि लाल रंगाचे डाग असतात. ते छोट्या जोकर सारखे दिसतात.

ते पिसूच्या पेक्षा मोठे नसतात. त्यांचे पाय लांब नसतात ते चांगल्या प्रकारे पोहू शकत नाही.

पण आता मुलांची घर सोडण्याची वेळ आली आहे. त्यांची आई त्यांच्या मागे आहे.


ती खूप अशक्त झाली आहे. कारण अनेक दिवस तिने काहीच खाल्ले नाही. ती जास्त दिवस जिवंत राहणार नाही. मुलं समुदात जातात. ते जवळपास दोन महिने पाण्यात तरंगतात.







त्यांचे पाय लांब होतात. ते आपल्या पायांवर चालू शकतात किंवा घसरू शकतात. ते चांगल्या प्रकारे पोहू शकतात.



छोटे ऑक्टोपस छोटे समुद्री जानवरांना खातात. काही छोट्या ऑक्टोपसांना मासे खातात. जे वाचतात ते मोठे होतात.

आता छोटे ऑक्टोपस खाण्यासाठी खेकड्यांचा शोध घ्यायला लागतात. ते आपल्या पायांवर असणाऱ्या टोकाच्या साहय्याने स्पर्श करू शकतात आणि चव घेऊ शकतात. ते खडकासारखा रंग घेतात आणि लपून बसतात. ते शाईचे काळे ढग उडवून शत्रूंपासून स्वतःचे रक्षण करू शकतात.







ते घर शोधण्यासाठी तयार आहेत. तों तरुण ऑक्टोपस काही खडकावर आपले पाय पसरतात. प्रत्येक खडकावर त्यांना छिद्र सापडते.



प्रत्येकाला एक जागा मिळते जिथे ते लपू शकतात, आराम करू शकतात आणि खाऊ शकतात. त्यांना समुद्रात घर मिळतात.

लेखकाच्या बाबतीत

डॉ. एवलिन शॉ न्यूयॉर्क शहरातील अमेरिकन म्यूज़ियम ऑफ नॅचरल हिस्ट्रीमध्ये पशु व्यवहार विभातात क्यूरेटर आहेत.. डॉ. शॉ यांनी सोळा वर्षे माशांचा अभ्यास केला आहे. त्यांनी कॅरिबियन आणि भूमध्य सागरमध्ये अनेक प्रकारचे ऑक्टोपस बघितले आहे.

अंत